ISSN 2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC





# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Refereed Research Journal
UGC Approved
**Special Issue - September 2017**

म.शि.प्र.मंडळाचे

## सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव आयोजित

### आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय परिषदेचा विशेषांक

# हुंडा-एक समस्या : आव्हाने व उपाय

दि.११/०९/२०१७




बोडके बी.आर.
(संपादक)

डॉ.व्ही.पी.पवार
(प्राचार्य)

| | | | |
|---|---|---|---|
| १०५ | हुंडाबळी विषयी प्रशासनाची भूमिका | प्रा. विलास भरतसिंग राजपूत | ३२४ |
| १०६ | हुंडा : कारणे, परिणाम व उपाययोजना - एक अभ्यास | प्रा.डॉ. वायकर ए.बी. | ३२८ |
| १०७ | हुंडा एक समस्या व कायद्याची अंमलबजावणी | झोडगे रामेश्वर सिद्धेश्वर | ३३२ |
| १०८ | हुंडा बळी विषयी प्रशासनाची भूमिका | प्रा.डॉ.बी.आर.कत्तुरवार | ३३४ |
| १०९ | "हुंडा पध्दती : एक समाजशास्त्रीय दृष्टिक्षेप" | रत्नपारखे शिवशंकर अशोकराव | ३३६ |
| ११० | "हुंडा प्रथेमुळे होणारे महिलांचे शोषन : एक सामाजिक अभ्यास" | डॉ. कहाळेकर सी.एम., प्रा.पवित्रे किशन यादवराव | ३४० |
| १११ | हुंडाप्रथेची ऐतिहासिक पार्श्वभुमी ,सद्यस्थिती व उपाय | प्रा. सुदर्शन उध्दवराव स्वामी | ३४३ |
| ११२ | हुंडा प्रथा : कारणे, वास्तव, परिणाम व उपाय | डॉ. गायकवाड एम. डी. | ३४६ |
| ११३ | हुंडाप्रथा : कारणे व उपाय | प्रा.कांबळे दत्ता दौलाजी | ३५० |
| ११४ | हुंडा एक सामाजिक समस्या | प्रा. डॉ. मारोती माधवराव शिंदे | ३५२ |
| ११५ | भारतीय कुटुंब व्यवस्था आणि हुंडा पध्दती | डॉ. भालेराव जे.के. | ३५४ |
| ११६ | हुंडाप्रथा आणि जनमानस | डॉ. राजाराम अं. झोडगे | ३५७ |
| ११७ | हुंडा : एक सामाजीक समस्या कारणे,वास्तव व उपाय | डॉ. शिंदे डि.एस | ३६० |
| ११८ | हुंडाबळी व प्रशासन | डॉ. आय. बी. साळुंखे | ३६३ |
| ११९ | हाल्या हाल्या दुधू दे या कांदबरीतील उध्दवस्त जीवनाचे चित्रण | प्रा. डॉ. सदाशिव हरिभाऊ सरकटे | ३६७ |
| १२० | हुंडा व सामाजिक समस्या व उपाय | प्रा. गाडवे मनिषा महारुद्र | ३७० |
| १२१ | हुंडा पद्धती समस्या : अव्हाने व उपाय | प्रशांत भाऊसाहेब सोळंके | ३७३ |
| १२२ | A Discussion of Women`s problems in Jyoti Mhapsekar`s play `Mulgi Zali Ho` | Dr. Sunil Raosaheb Raut | ३७५ |
| १२३ | DOWRY AS A FACTOR OF VIOLENCE IN INDIAN SOCIETY | Dr.Rathod Premdas Manohar, Asst.Prof.Mundhe | ३७८ |
| १२४ | The Dowry Prohibition Act, 1961 Myths & reality | Vijay Laxman Tarode | ३८० |
| १२५ | Evils of Dowry System in India: Sociological Analysis | Dr. Bibhishan kare | ३८२ |
| १२६ | DOWRY DEATH | Bembalge Sarita Mahadev | ३८५ |
| १२७ | Dowry System: Causes, Effects & Its Solutions | Dr. R. K. Kale | ३८८ |
| १२८ | A RESEARCH STUDY ON INDIAN DOWRY: VIVID PROBLEM | Dr.Patange Vithal Nanabhau | ३९३ |

# हुंडा बळी विषयी प्रशासनाची भूमिका

**प्रा.डॉ.बी.आर.कत्तुरवार**

विभाग प्रमुख लोकप्रशासन विभाग व संशोधन केंद्र,
देगलूर महाविद्यालय देगलूर जि.नांदेड

वैभवशाली संस्कृतीचा वारसा लाभलेल्या भारतीय समाज व्यवस्थेमध्ये अनेक आदर्शवादी, मानवतावादी मुल्यांची जोपासना करण्यात आलेली आहे. वसुधैव कुटुंबकम, प्राणी मात्रा विषयी दयाभाव, वृक्षपूजा म्हणजे वासूदेव पूजा, अहींसा परमो धर्म, परधर्म संहिष्णूता इत्यादी आदर्श मानवी मुल्यांचा पुरस्कार भारतीय समाज व्यवस्थेत करण्यात आलेला दिसून येतो. ही आदर्श बाब असली तरी याच समाज व्यवस्थेत मागासवर्गीय समाज आणि महिलांचे प्रचंड शोषण याच व्यवस्थेने केलेले दिसून येते. शेकडो वर्षापासून चार भींतीच्या आत आवारणा-या व स्वतःचे कार्यक्षेत्र चूल आणि मूल येवढे मर्यादीत मानणा-या भारतीय महीलांना भारतीय संविधानाने समान अधिकार व समान दर्जा प्रदान केले आहे.

केवळ व्यासपीठावर एखादया पुस्तकामध्ये स्त्री - पुरुष समानता, हुंडाबंदीच्या संदर्भात भाष्य केले जाते आणि म्हटले जाते, **मुलापेक्षा मुलगी बरी - प्रकाश देते दोन्ही घरी** अन वास्तवामध्ये मुलीनां बंदीस्त जीवन जगावे लागत आहे. लहानपणी आई - वडीलांच्या बंधनात, तरुणपणी पतीच्या बंधनात आणि वृध्दपणी सून व मुलाच्या बंधनाम बंदीस्त जीवन जगावे लागते. निसर्गत : पन्नास लोकसंख्येच्या पन्नास टक्के वाटा असणा-या व कुटूंबातील सर्व घटकांच्या विकासासाठी अहोरात्र मेहनत करणा-या महीलांना जीवन जगत असतांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते महीलांचे शारिरीक व मानसीक शोषण, लैंगीक शोषण, अपहरण, विनयभंग, बलात्कार, इत्यादी समस्येबरोबर हुंडाबळीची समस्या देखील अधिकाधिक गंभीर बनत चालली आहे.

**हुंडा व हुंडाबळी :-**

साधारणपणे मुलीच्या विवाहाच्या वेळी वधूपीता किंवा कुटूंबाकडून (वराला) मुलाला जी रक्कम, दागीणे, वाहन अथवा अन्य स्थावर व जंगम मालमता दिली जाते त्यास प्रचलीत भाषेत हुंडा असे म्हणतात.

भारतीय दंड विधान (I.P.C.) संहीतेमधील कलम नं. ४९८ (अ) मध्ये हुंडाबळीची व्याख्या नमूद करण्यात आली आहे. जेव्हा एखाद्या स्त्रीचा मृत्यू जाळपोळ किंवा शारिरीक जखमामूळे होतो किंवा अन्य संशयीत परिस्थितीत किंवा विवाहापासून सात वर्षाच्या आत होतो आणि हुंडयाशी संबंधीत मागण्या मृत्यूपूर्वी तीचा पती किंवा त्याच्या नातेवाईकाकडून केल्या जावून सातत्याने तीचा छळ केला जात आहे, असे दिसून आले तर तीला हूंडाबळीची केस असे म्हटले जाते

अशामुळे मृत महीलेचा पती, सासरा, सासू, अथवा अन्य नातेवाईकांनी हा हूंडाबळी घेतला म्हणून जर महीलेच्या जवळच्या नातेवाईकाने पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केल्यास शिक्षापात्र गुन्हा म्हणून नोंद घेतली जाते.स्वामी विवेकानंद असे म्हणतात की, जगातील सर्व प्रगत राष्ट्र महीलांना शिक्षण देवून, त्यांना समानतेचा हक्क देवूनच मोठी झाली आहेत.

**यत्र नार्यस्ते पुज्यन्ते**

**तत्र रमते देवतः**

ज्या ठीकाणी स्त्रीयांचा सन्मान केला जातो तिथे देवाचे वास्तव्य असते पण दूदैवाने साम्राज्य विस्तारासाठी जेव्हा

जेव्हा युध्द होत असे तेंव्हा विजयी गट जड - जवाहीराबरोबर, महीलांना उपयोग्य वस्तू समजून लूट करीत होते. तेव्हापासूनच स्त्रीया असूरक्षित बनल्या त्यांचे चारित्र्य तथा शील जपण्यासाठी चार भींतीच्या आत चूल आणि मूल असे बंदीस्त जीवन जगू लागले इ. स. १७८९ मध्ये झालेल्या फ्रेंच राज्यक्रांतीतून स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधूता ही आदर्श मानवी मुल्य जगासमोर आली त्यातून स्त्रीयांचे शोषण थांबावे, त्यांना समान दर्जा मिळावा हा विचार जगासमोर आला. पण भारतीय समाज व्यवस्थेत आज एकविसाव्या शतकात देखील स्त्रीयांचे शोषण / छळ करण्याची विकृत मनोवृती अद्याप नष्ट झाली नाही. आज देखील भारतातील सर्व भागामध्ये कमी अधिक प्रामाणात हुंडाबळीची समस्या अस्तीत्वात असलेली दिसून येते

**हुंडाबळी व प्रशासनाची भूमिका :-**

भारत सरकारच्या अहवालानुसार प्रत्येक दिवशी ३३ महीलांचा हुंडाबळी जातो. इ. स. १९८४ मध्ये भारत सरकारणे हुंडा ही अमानवीय प्रथा नष्ट करण्यासाठी हुंडा प्रतिबंधक कायदा लागू केला आहे. प्रस्तूत कायद्याची प्रभावीपणे अमंलबजावणी करण्यासाठी पोलिस प्रशासन, व न्यायालयात प्रशासनाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असते.

इ.स. १८८६ पासून हुंडा व हुंडाबळीच्या केस संदर्भात आरोपीला हुंडाबळीच्या गुन्हयाकरिता जामीन दिला जात नाही. ( Criminal Procedure code १९८ - A ) नुसार वधूच्या जवळच्या नातेवाईकाने पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दिल्यास त्याची शिक्षापात्र गुन्हा म्हणून प्रशासनाला नोंद घ्यावी लागते. भारतात एका वर्षात पाच हजार हून अधिक महीला हुंडाबळीची शिकार ठरत आहेत. ही बाब एकविसाव्या शतकातील मानवतेपुढील आव्हान आहे.

एंकेकाळी राजे, महाराजे श्रीमंत जमीनदार, उद्योगपती यांच्या घराण्यात असलेली हुंडाप्रभा मागील काही दशकापूसन समाजातील सर्व स्तरापर्यंत पोहंचली आहे. हुंडयाच्या लाभापोटी निष्पाप अशा नववधूचा छळ करणे, मारहाण करणे, अपमान करणे व ठार मारणे असे गून्हे कमी होण्याऐवजी वाढतांनाच दिसून येत आहेत.कायदयाचा धाक दाखवून हुंडा व हुंडाबळी य दोनही समस्या नष्ट करणे आवश्यक आहे.

स्त्रीला कमी लेखणे, शरिराला गंभीर इजा पोहंचवीणे, बेदम मारहाण करणे, विहीरीत ढकलणे, पेटविणे खून करणे गोळया घालणे, चाकूने भोसकणे इत्यादी घटना जर एखाद्या पूरुषाकडून घडल्यास संबधीत प्रकारणाची गंभीर दखल घेवून गुन्हेगारांना शिक्षा करणे आवश्यक आहे.

भारतात दर ७७ व्या मीनीटाला एक हुंडाबळी ठरतो अशी क्राईम रेकॉर्ड व्यूरोने आकडेवारी प्रकाशीत केली आहे. ही गंभीर बाब मन सून्न करणारी व जाणिवा बधीर करणारी आहे.अर्थात हुंडाबळी सारखी गंभीर समस्या समूळ नष्ट करण्यासाठी विविध स्तरावर प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**संदर्भ :-**

१ प्रा.लक्ष्मण कोतापले :- भारतातील सामाजिक कल्याण प्रशासन, विद्या बूक पब्लीशर्स, औरंगाबाद जून - २०१४

२ श्री. ज. श. आपटे :- भारतातील महीला विकासाची वाटचाल डायमंड पब्लीकेशन, पूणे - २००८

३ भगवती स्वाती :- महिला सशक्तीकरण क्यो १ और कैसे ? आर. बी. एस. ए. पब्लीशर्स , जयपूर

४ यशदा,यशमंथन पुणे जुलै - सप्टेंबर २०१३